# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),नागपूर वनवृत्त नागपुर यांचे कार्यालय.

बीएसएनएल संचार लक्ष्मी भवन,कस्तूरचंद पार्क,नागपूर-४४० ००१

फोन नं.०७१२-२५६४५६९, E-mail:-ccftnagpur@mahaforest.gov.in

महाराष्ट्र वन विभाग


क्रमांक- कक्ष-५/दक्षता/प्र.क्र.१०/२०२२-२३/ 4983 नागपुर, दिनांक 30/01/23

महत्वाचे / ई-मेलव्दारे/आदेश

**मालकी प्रकरण हाताळतांना अनियमतता**

विषय- महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ अंतर्गत वृक्ष अधिकारी यांचेमार्फत होत असलेल्या अनियमतेमुळे वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील मालकी प्रकरणे १००% टक्के तपासणी करणेबाबत

संदर्भ- १) या कार्यालयाचे जावक क्रमांक कक्ष-५/दक्षता/११६५ दिनांक २७/१०/२०२२
२) वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) सर्व यांची दिनांक २१/१०/२०२२ ची सभा
३) वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) सर्व यांची दिनांक २१/०१/२०२२ ची सभा

विषयांकित प्रकरणाचे अनुषंगाने नागपूर वनवृत्तातील प्रकरणांचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले आहे की, अलिकडील काळात मालकी प्रकरणात अनियमितता होणे व त्याबाबची तक्रार या कार्यालयात प्राप्त होण्याचे प्रमाण वाढले आहेत. नागपूर वनवृत्तात लाच लुचपत प्रतिबंधक कायदा अंतर्गत कार्यवाहीचे प्रमाण मालकी प्रकरणात जास्त दिसून येते. मालकी प्रकरणातील ॲन्टी करप्शन ब्युरो विभागाचे कार्यवाहीमूळे संबंधीत कर्मचारी / अधिकाऱ्यांचे चारित्र्यावर शितोंडे उडतात, समाजातील स्थानास धक्का पोहचतो त्याच बरोबर वनविभागाची प्रतिमा सुध्दा मलीन होत असते, अशावेळी मालकी प्रकरणे हाताळतांना वेळीच त्रुट्या दुरुस्त झाल्यास मालकी प्रकरणात ॲन्टी करप्शन ब्युरो ची कारवाई टाळता येईल.

१.०० वनपरिक्षेत्र अधिकारी (फिरते पथक) यांना खालील स्वाक्षरीकर्ते यांचे कार्यक्षेत्रातील मालकी प्रकरणे तपासून सविस्तर अहवाल सादर करणेकरिता या कार्यालयाचे वरील संदर्भ १ नूसार निर्देशित करण्यात आले आहे. तथापि भंडारा वनविभाग अंतर्गत प्रादेशिक वनपरिक्षेत्रात कार्यरत वन परिक्षेत्र अधिकारी हे मालकी प्रकरणातील वृक्षतोड कटाई आदेश प्रपत्र-६ व त्यासोबत आवश्यक सहपत्रांच्या प्रती वेळीच वन परिक्षेत्र अधिकारी फिरते पथक यांना पुरवठा करीत नसल्याची बाब या कार्यालयाचे निदर्शनास आली आहे. शासकीय कामात वेळीच सहकार्य करुन, विहीत कालावधीत कामे पूर्ण करणे हे शासकीय अधिकाऱ्यांचे कर्तव्य आहे. यावरुन आपण वरिष्ठ कार्यालयाचे निर्देशांची पालन न करता जाणीवपूर्वक अवहेलना करीत असल्याचे स्पष्ट होते.

२.०० खालीलस्वाक्षरीकर्ते यांनी माहे जानेवारी २०२३ मध्ये प्राप्त गुप्त माहितीचे आधारे नागपूर, वर्धा व भंडारा वनविभागातील काही मालकी प्रकरणांची प्रत्यक्ष मौका तपासणी केली असता, त्यामध्ये प्रथमदर्शनी निदर्शनास आलेली अनियमितता पूढील प्रमाणे-

- प्रादेशिक वन परिक्षेत्राचे वन परिक्षेत्र अधिकारी तसेच त्यांचे अधिनस्थ क्षेत्रीय कर्मचारी प्रत्यक्ष मौकास्थळी जावून मौका पाहणी करीत नाहीत.
- मालकी प्रकरणातील आवश्यक सर्व कामे संबधीत कंत्राटदारच करीत असल्याचे क्षेत्रीय कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा केल्यावर निदर्शनास आले.




Scanned with OKEN Scanner

- त्यामूळे सर्रासपणे शासकीय जमीनी, पांधन रस्ता तसेच नदी नाल्यांच्या काठावरील लगतच्या कास्तकारांचे हद्दीतील झाडे अवैधरित्या तोड केली असल्याचे आढळते.

- सात-बारातील नोंदीप्रमाणे मुळ मालकाच्या संमतीविना कंत्राटदारामार्फत झाडे कटाई होत असल्याचे आढळून आले असून, सातबारामधील नोंदीप्रमाणे इतर मालकांच्या संमतीपत्रावर कंत्राटदारामार्फतच सह्या करुन संमतीपत्र वन परिक्षेत्र अधिकारी यांचे सादर केल्याचे आढळते.

- शेतमालकाचे वतीने मालकी प्रकरण सादर करणारे कंत्राटदार यांचेवर अंधविश्वास ठेवून वन परिक्षेत्र अधिकारी हे कोणतीही शहानिशा न करता वृक्षतोड परवानगी आदेश जारी केल्याचे आढळते.

- अवैध वृक्षतोडीवर क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांचे कोणतेही नियंत्रण नाही.

३.०० खालीलस्वाक्षरीकर्ते यांचे असेही निदर्शनास येते की,

- नागपूर वनवृत्तातील अनेक विभागीय चौकशी प्रकरणाचा देखील आढावा घेतला असता, किमान ७० ते ८० टक्के प्रकरणे ही मालकी खसरा बाबीशी संबधित असून, सर्व प्रकरणात ॲन्टी करप्शन ब्यूरो विभाग यांचेमार्फत कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास येते.

- तथापि मालकी प्रकरणे निष्काळजीपणे हाताळल्याने शासकीय जमीनीवरील होत असलेली अवैध वृक्षतोड होत असल्याची बाब सुकृतदर्शनी निदर्शनास येते.

- काही प्रकरणे तर लोकायुक्त कार्यालय तसेच उच्च न्यायालयात देखील दाखल झालेली आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे.

- वन व वनसंपत्तीचे संरक्षण करणे वन परिक्षेत्र अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे. परंतू आद्य कर्तव्यातच आपण दिरंगाई करीत असल्याची बाब प्रथम दर्शनी निदर्शनास येते.

- या कार्यालयाचे जावक क्रमांक कक्ष-५/दक्षता/११६५ दिनांक २७/१०/२०२२ नुसार वन परिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक यांना १०० टक्के मालकी प्रकरणे तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या,

- तथापि दिनांक २१/०१/२०२३ रोजी फिरते पथक वन परिक्षेत्र अधिकारी यांचे सभेत आढावा घेतला असता, मालकी प्रकरणाचे कटाई आदेशाची प्रतच विहित वेळेत फिरते पथकास प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. यावरुन आपण वरिष्ठ कार्यालयाचे आदेशाची अवहेलना करीत असल्याचे आढळते.

- वरिष्ठ कार्यालयाचे आदेश / निर्देश / सूचनांची अवहेलना करणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असून, शासकीय शिस्तीचा भंग ठरतो.

- मालकी प्रकरणातील वरील अनियमिततेकरिता वनपरिक्षेत्र पातळीवरील विविध शासकीय कामांचा प्रचंड व्याप आणि त्याअनुषंगाने कमी पडणारा कामाचे नियोजनाचा अभाव असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

- याअनुषंगाने आवश्यक सर्व बाबी लक्षात घेता, काही कालावधीकरिता मालकी प्रकरणास परवानगी देण्याचे काम कायमचे बंद करावे, अशा निष्कर्षापर्यन्त खालीलस्वाक्षरीकर्ते आलेले आहे. किंवा त्यात धोरणात्मक सुधारणा करण्याचा गांभीर्याने विचार करण्यात येत आहे.



Scanned with OKEN Scanner

४.००      खाजगी मालकी प्रकरणात होत असलेली अनियमितता तसेच अवैध वृक्षतोडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक असल्याने, वर नमूद सर्व बाबीं विचारात घेता, या पत्राव्दारे पूढीप्रमाणे काही महत्वाचे निर्देश जारी करणेत येत आहेत-

## निर्देश

ज्या मालकी प्रकरणाचे क्षेत्रालगत शासन जमीन, कोणतेही शासकीय जंगल, झुडपी जंगल, गावठाण, पांधण रस्ता, नदी-नाले इत्यादी आहेत, अशी मालकी प्रकरणे वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त होताच, अशा प्रकरणात TILR विभाग व सर्व्हेअर यांचे संयुक्त सर्व्हेक्षण करुनच तात्काळ ते प्रकरण वन परिक्षेत्र अधिकारी फिरते पथक यांचेकडे पाठवून, प्रथम त्या प्रकरणात फिरते पथक यांचेमार्फत तपासणी करुन त्यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्याशिवाय वृक्ष अधिकारी यांनी कटाई आदेश निर्गमीत करु नयेत. अन्यथा संबंधित वृक्ष अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक ०१/०२/२०२३ पासून अंमलात आणावी. कशाही परिस्थीतीत ०१/०२/२०२३ नंतर एकाही प्रकरणात याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(रंगनाथ नाईकडे)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)**
**नागपूर**

प्रति
वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) तथा वृक्ष अधिकारी सर्व
---------------------------------
वनविभाग-नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया

प्रतिलिपी माहिती व पूढील कार्यवाहीस-

१) उपवनसंरक्षक नागपूर / वर्धा / भंडारा व गोंदिया वनविभाग यांनी विषयांकित प्रकरणी आपले कार्यक्षेत्रातील वन परिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) सर्व यांना वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणेबाबत निर्देशित करुन, वन परिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक यांना आवश्यक सर्व सहकार्य करावे. या महत्वाचे शासकीय कामी कोणतीही कुचराई व जाणीव पूर्वक निष्काळजीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी.
२) विभागीय वन अधिकारी (दक्षता) नागपूर.
३) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) नागपुर-१
३) वनपरिक्षेत्र अधिकारी, फिरते पथक-२, नागपुर
४) वनपरिक्षेत्र अधिकारी, अवैध शिकार प्रतिबंधक घटक, नागपुर.
५) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) वर्धा-१
६) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) वर्धा-१(तळेगांव)
७) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) भंडारा.
८) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) गोंदिया-१
९) वनपरिक्षेत्र अधिकारी, (संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन) गोंदिया-२ (नवेगांवबांध)
१०) महसूल कक्ष, निर्देशन कार्यालय नागपूर.



Scanned with OKEN Scanner